५९८/२ (९११)

इ. वि. का. राजवाडे संशोधन मंडळ धुळें.

—: हस्त लिखित ग्रंथ संग्रह :—

ग्रंथ क्रमांक ५९८/२ (९११)

ग्रंथ नाम आन्हिक कर्मप्रकाश.

[illegible]

विषय [illegible] ग्रंथ.

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai

(1)

# अथआह्निककर्मप्रकाशस्फोटार्थप्रारंभ

A project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

१ श्रीगणेशायनमः श्रीगजवदना वंदुनि, आह्निककर्मप्रकाश समजाया ॥ करितों स्फोटा प्राकृत, भाषेनें चंद्रकांत समजा या १ ग्रंथाच्या आरंभीं अभीष्टार्थाची सिद्धि होण्याकरितां परमात्मचिंतनादिक मंगल करावें, असा सच्छास्त्रनियम आहे; आणि हेंच मंगल अनुषंगतः वाचकासहि व्हावें; ह्याकरितां वाचनिक मंगल करितो. **श्रीमत्**—श्रीमान् म्हणजे धर्मार्थादिकचतुर्विधपुरुषार्थदाता, मंगलस्वरूपी, विघ्नांचा नाश करणारा, ज्याच्या स्तवनमात्रेंकरून ब्रह्मदेवप्रभृतिकांचे साधनीयार्थ त्वरित सिद्ध होतात, अशा गजाननाचें अभिवादन करितों. गजाननास अशीं विशेषणें देऊन वंदन करण्यानें सुमंगल व निर्विघ्न ग्रंथाची समाप्ति आणि धर्मादिकांचा लाभ सत्वर व्हावा हा अभिप्राय. १ हा ग्रंथ प्रमाणभूत आहे; आणि ब्राह्मणांनींच ग्रहण करावाच हें सांगतो. **वेदादि**—नित्यकर्मविधायक वेद मनुस्मृति इत्यादिकांच्या सारभूतवाक्यांनीं आणि आश्वलायनादिकसूत्रांनीं गुंफलेला हा '**आह्निककर्मप्रकाशक**' म्हणजे सूर्योदयापासून पुनः सूर्योदय होईपर्यंत अवश्य आचरावयाचें कर्म प्रत्यक्ष करणारा ग्रंथ ईश्वरावर प्रीति करणाऱ्या ब्राह्मणांच्या हारवत् कंठगत होऊन तद्बोधितकर्मद्वारा त्यांस आनंद देवो. २ अथ उपोद्घात—आतां, उपोद्घात म्हणजे पुढें सांगावयाचा जो 'आह्निककर्मप्रकाश' ग्रंथ त्याच्या उपयोगी परिभाषारूप प्रकरण सांगतो. मनु, **आचारात्**—मन्वादिऋषिप्रणीतस्नानादिनित्यकर्मास आचार असें म्हणतात. आचारसंपन्नास आचारजन्यपुण्यानें आयुष्य, इच्छेसारखी संतति व सत्पात्रीं दानानें अविनाशी धन प्राप्त होतें; आणि कृष्णदंताद्यनुमित अरिष्टाचा नाश होतो. जरीं आचारहीनमनुष्यास बहुत आयुष्य, संतति आणि धन असलें तरीं ज्या संततीनें धर्मविवाहश्राद्धादिक्रियाद्वारा कुलाचा उद्धार होत नाहीं; ज्या आयुष्यांत परलोकप्राप्तिसाधन झालें नाहीं; आणि जें अन्यायोपार्जित धन असद्व्ययीं लागलेलें अथवा ज्याचा राजादिकांकडून लवकरच नाश व्हावयाचा; हीं सर्व असून व्यर्थ होत. १ **आचारः**—स्वर्गादिलोकप्रापकयज्ञादिकर्मकरण्यास आचारानेंच अधिकारी होतो; म्हणोन मनुष्यास १
आचार हाच कल्याणकारक श्रेष्ठ धर्म म्हणजे पुण्य संपादन करण्याचा मार्ग होय. जेणेंकरून ह्या लोकांत

Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal ... and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(2A)

महाकीर्ति आणि परलोकांत परम सुख प्राप्त होतें. २. आचारात्—आचारानें श्रैष्ठ्य म्हणजे रजस्तमोगुणरहित सात्विकगुण प्राप्त होतो. आचारानेंच कर्म म्हणजे यज्ञाद्यनुष्ठानजन्य फल प्राप्त होतें; संध्यादिनित्यकर्महीन ब्राह्मणसंक्रांत्यादिनिमित्तक दानादिकर्म करण्यास अनधिकारी, अनधिकाऱ्यानें केलेलें कर्म निरर्थक होतें, किंबहुना दोषसंपादनासहि कारण होतें. नित्यनैमित्तिकानुष्ठानानें अंतःकरणशुद्धिद्वारा मोक्षोपयोगी ब्रह्मसाक्षात्काररूप ज्ञान होतें. अशा ज्ञानानें परमात्मसच्चिदानंदस्वरूपीं लीन होतो; पुनः त्यास जन्ममरणाची अनुवृत्ति राहत नाहीं. जसा जसा कर्मसंस्कार दृढ होतो, तशी तशी योग्यता वाढत्ये. ३. पूर्वतीनश्लोकांनीं सर्वसुखांस आचार हेतु आहे असें सांगितलें. आतां आचारहीन द्विज सांगवेदांत निष्णात जरीं आहे, तरीं त्यास त्यापासून पुण्य प्राप्त होत नाहीं असें सांगतो. चतुर्विंशतिमतांत (मन्वादिचोवीसऋषिसंमत स्मृति आहे, तींत), आचारहीनं—आचारहीनद्विजानें जरी शिक्षाकल्पादिषडंगवेदांचें अध्ययन केलें, तरीं ते वेद त्यास पापापासून मुक्त करीत नाहींत; इतकेंच नाहीं तर! त्याच्या मृत्युकालीं म्हणजे वेदधारणशक्ति शिथिल झाली असतां, स्वविहितकर्माचा अनादर करणारा म्हणोन जसें, पक्ष्यांना उडण्याची शक्ति आली असतां ते खोपा टाकतात, पुनः त्याची ओळख ठेवीत नाहींत; तसें त्याचा त्याग करितात. एतदर्थ वेदांस छंदस म्हणजे स्वेच्छाचारी अशी संज्ञा आहे. ४ पराशर, यस्त्वाचार—जो आचारहीन आहे, तो ज्ञाता, वेदासक्त कां असो! त्यास याजनाध्ययनादिधर्मकार्यांपासून दूर करावें; यावत्कालपर्यंत ब्राह्मण्यरक्षक कर्म करीत नाहीं तावत्कालपर्यंत तो शूद्रप्रतिनिधि आहे. ५. "पूर्वोक्त पांचश्लोकांनीं आचाराचें माहात्म्य, आचारविहीनब्राह्मणाचे सांगवेदाध्ययनादिश्रम निरर्थक आणि त्यास श्राद्धादिधर्मकृत्यांकडें योजूंनये असें सांगितलें. आतां, वेदाच्या बहुत शाखा (भाग) आहेत, परंतु पितृपितामहादिकांनीं ज्या शाखेचा कर्माकडे स्वीकार केला, तच्छाखोक्तमंत्रानेंच कर्म करावें असें सांगतो." काशीखंडात. वेदोदितं—निरंतर शक्त्यनुसार आळस न करितां वेदप्रणीत स्वकीय कर्म आचरावें; तें करीत असतां उत्तम गति प्राप्त होईल. ६.

(3)





"मन्वादि प्रणीत शास्त्रांशीं अविरुद्ध असलेल्यां अन्यसमयादिप्राप्तकृत्यांचाहि अवश्य अंगीकार करावा
असें सांगतो." स्मृतिसंग्रहांत, **समया** — कालाच्या अनुरोधानें उत्पन्न झालेला धर्म, उदाहरण 'ग्रीष्मऋ-
तूंत एकदिवशीं सर्वांनीं वनभोजन करावयाचें.' ज्ञातीच्या अनुरोधानें उत्पन्न झालेला धर्म, जसें 'महारा
ष्ट्रब्राह्मणांत, हरितालिकेचा उपवास तीनवर्षांच्या कुमारिके कडूनहि करवावयाचा.' देशधर्म, 'उष्णदेशांत
अभ्यंगस्नानादि.' कुलधर्म, 'बोडण, दिवटी बुधली हातांत घेऊने देवाचा नीराजनविधि करणें इत्यादि.' ग्रा-
माचार म्हणजे ग्रामधर्म, 'ह्या गावकरी लोकांनीं अमुकगावाशीं किंवा देशाशीं क्रयविक्रयादिसंबंध न क-
रणें. इत्यादि.' अशा प्रकारच्यां शास्त्राप्रतिकूलधर्मांचें आचरण सर्वांहीं करावें. ह्या श्लोकांत धर्म व आ-
चार हे शब्द सामान्यक्रियावाचक आहेत. ७ "कोणत्याहि वाक्यावर विश्वास ठेवून तद्बोधितक्रिया वि-
शेषज्ञानपुरःसर करून तिचा परिणाम बरोबर समजल्याशिवाय तें खरें किंवा खोटें हें कळत नाहीं; हा
साधारण नियम आहे. वेद स्वतःप्रमाण आहेत; आणि वेदांच्या अनेक शाखा उछिन्न झालेल्यांचे मन्वा-
दित्रिकालज्ञांहीं स्मरण करून वाक्यरचना केल्या. ज्यांस 'स्मृति' असें म्हणतात त्यांसहि वेदमूलकत्व
प्रामाण्य आहे; तशींच पुराणांतील धर्मविधिबोधक वाक्यें वेदानुसारी असल्यानें तींहि प्रमाण आहेत;
असें सर्वतत्वज्ञाते सानुभविक निरभिमानिक याज्ञवल्क्यादिक म्हणत आले, अशां शाब्दादिप्रमाणांनीं
वेदादिवाक्यावर विश्वासच ठेवणें अवश्य आहे असें सांगतो." चतुर्विंशतिमतांत, **पुराणं** — मत्स्यादि-
पुराण, मन्वादिप्रोक्त धर्मशास्त्र, सांगवेद आणि चिकित्सक म्हणजे अमुक औषधानें अमुक रोग शांत होतो
अशा प्रकारचे रोगशमोपाय सांगणारें शास्त्र, ह्यांच्या अर्थाविषयीं सद्धेतूंच्या कल्पना होतील तितक्या
कराव्या, परंतु ज्या अर्थाविषयीं कल्पना होत नाहीं, तद्बोधक वाक्य हेतूशून्यार्थाचें प्रतिपादक म्हणो-
न निरर्थक अथवा असद्धेतुकल्पनेनें विपरीतार्थबोधक आहे; असें न समजतां त्यांची आज्ञाच प्रमाण मा- २
नावी. सर्वज्ञत्वादिगुणसंपन्नप्रयुक्तवाक्यें अल्पजीवित्वाल्पज्ञमनुष्यांहीं दृष्टादृष्टार्थहेतुक आहेत अशीच

(3A)

कल्पना करावी हें न्याय्य आहे. कोणत्याहि वाक्याच्या साधारणैकदेशीं सत्यत्वप्रतीति झाली, म्हणजे तें वाक्य प्रायः सत्यच आहे असा निश्चय होतो; एतदर्थ ह्या श्लोकांत शीघ्रदृष्टार्थज्ञापकचिकित्सकाचें ग्रहण केलें आहे. वेदांस स्मृत्यादिमूलक प्रामाण्य मानणें हें शाखाचंद्रन्याया सारखें, अथवा इष्टराशिकगणितांतील स्वदृष्टसत्यसंख्येनें स्वादृष्टसत्यसंख्येच्या ज्ञाना सारखें होय. ८ पद्मपुराणांत, योवैदिक--जो ब्राह्मण वेदप्रणीतकर्मांचा अनादर करून स्मृत्युक्त किंवा भारतादिइतिहासोक्त कर्म, हेंच मुख्य आहे अशा अविवेकानें आचरील; तर तज्जन्य पुण्य त्यास प्राप्त होणार नाहीं. ९ "आतां कोणती क्रिया केली म्हणजे धर्म उत्पन्न होतो, हें धर्माचें लक्षण सांगतो "मनु, श्रुति -- स्वकीयब्रह्मयज्ञादिकर्मांत श्रुतिस्मृत्युक्त दर्भपवित्रादि आणि साधूंचा आचार म्हणजे आसन बंधपात्रस्थापनादि हें अंगत्वेंकरून संबद्धकर्म धर्मांचें साधारण कारण अनालस्यानें अवश्य आचरावें. कोणतेंहि मुख्यकर्म अंगोपांगेंकरून हीन झालें असतां तज्जन्यफलाचेंहि वैगुण्य होईल म्हणोन अंगकर्मांची उपेक्षा करूं नये. १० वेदोऽखिलो-- ऋग्वेद, यजुर्वेद, सामवेद आणि अथर्वणवेद हे अधिकारिपरत्वें धर्म म्हणजे पुण्यप्रापककर्माविषयीं आदिकारण होत. तसेंच वेदवेत्त्यामन्वादिकांच्या स्मृत्या आणि शील म्हणजे वेदाभ्यास करणें, देवपितरांची भक्ति, सौम्यपणा (आकृतीनें उग्र न दिसणें), कोणास त्रास न देणें, कोणाच्या गुणावर दोषाचा आरोप न करणें, मृदुता (नम्रपणा), वाईट न बोलणें, सर्वांशीं मैत्री, प्रियवक्तृत्व, दुसऱ्यानें उपकार केलेला जाणून प्रत्युपकार करणें, शरणागताचें रक्षण करणें, करुणा आणि शांति (अपराधाची क्षमा), अशा हारीतोक्त तेरा प्रकारचें वृत्त, धार्मिकांचा आचार म्हणजे वस्त्रधारणादिव्यवहार आणि विकल्पविहितकर्मांचा एक पक्ष स्वीकारण्याविषयीं अंतःकरणाचा संतोष, हेंहि धर्माचें कारण होय. ११ याज्ञवल्क्य, देशेकाल-- आर्यावर्तादिदेशांत संक्रांतिप्रभातादिकालीं उपायानें म्हणजे यथाविधि न्यायोपार्जितद्रव्याचें सत्पात्रीं दान करणें हें आणि अशाप्रकारचें शास्त्रोक्त अन्यहि धर्माचें कारण होय. १२ बृहस्पति, दया-- सर्ववर्णांचे दया, क्षमा, अनसूया, शौच, अनायास,

(५)

आ॰ अर्थ॰ ३ मंगल, अकार्पण्य आणि अस्पृहत्व हे गुण पुण्यास कारण आहेत. १३ "पूर्वोक्त श्लोकांत जे दयादि गुण सां- उपो॰
गितले ह्यांचीं लक्षणें सांगतों." परेवा— कोणी अन्य असो, बंधुवर्गांतला असो, मित्र असो, अथवा शत्रु असो, जो विपत्तिग्रस्त झाला त्याचें रक्षण करणें ह्यास दया असें म्हणतात. १४ बाह्येवा— कोणीं अन्यानें शरीरास दुःख दिलें अथवा मनोवेधकवाक्यादिकांनीं अंतःकरणास दुःख दिलें असतां जो दुःख देणारास पीडा करीत नाहीं, किंवा चित्तांत क्रोधहि करीत नाहीं; ह्या त्याच्या गुणास क्षमा असें म्हणतात. १५ गुणान्न— जो स्वकीय गुणानें अन्यगुणवंतांचा तिरस्कार करीत नाहीं; अल्पगुणी पुरुषाचीहि प्रशंसा करितो; आणि दुसऱ्याच्या दोषाकडे लक्ष देत नाहीं; ह्या त्याच्या गुणास अनसूया असें म्हणतात. १६ अभक्ष्य— अभक्ष्य म्हणजे शास्त्रनिषिद्ध पदार्थ ह्यांचें भक्षण न करणें, अनिंदितवस्तूंशींच संबंध ठेवणें, आणि स्वकीयवर्णाश्रमाच्या अनुरोधानें शास्त्रबोधित धर्मावर व्यवस्थित असणें ह्यास शौच असें म्हणतात. १७ शरीरं— ज्या शास्त्रविहितमध्याह्नबहिःस्नानादिकेंकरूनहि शरीरास रोगादि अत्यंत पीडा होईल तर तें न करितां त्यांचा मंत्रस्नानादि अनुकल्प करावा; ह्यास अनायास असें म्हणतात. १८ प्रशस्ता— प्रशस्त म्हणजे ज्याची वेदशास्त्रवेत्ते शिष्ट प्रशंसा करितात तें कर्म, त्याचें यावज्जीव निरंतर आचरण करणें; आणि तद्विरुद्धकर्माचा त्याग करणें; ह्यास तत्वद्रष्टे ऋषि मंगल असें म्हणतात. १९ स्तोकादपि— नित्यशः शक्त्यनुसार आपलें दैन्य न दाखवितां अंतःकरणपूर्वक अल्पतरी यथाविधि दान करावें; ह्यास अकार्पण्य असें म्हणतात. २० यथोसन्नेन— न्यायानें जें प्राप्त होईल, तें अल्प कां धान्यद्रव्यादि वस्तु असो; त्यावरच संतुष्ट असावें. दुसऱ्याचें द्रव्य याचनादिकोपायांनीं मिळण्याची इच्छाहि करूनये. ह्यास अस्पृहा असें म्हणतात. २१ "आतां ज्या कर्माचीं स्वसूत्रापेक्षां अन्यसूत्रांत अधिक अंगें ३
सांगितलीं आहेत, परंतु त्यांचा स्वीकार न करितां स्वसूत्रोक्तकर्म आचरल्यानेंहिं तें अंगहीन होत नाहीं

(५A)

असें सांगतो. "गृह्यपरिशिष्टांत, बह्वल्पं – ज्यास स्वगृह्यसूत्रांत विस्तारानें किंवा संक्षेपानें जितकें कर्म सांगितलें आहे, तितकें केलें असतां तो सांगकर्मफलभोक्ता होतो. २२ यन्नाम्नातं – जें गृह्य कर्म स्वशाखेंत पठित नाहीं; जसें – ऋक्शाखेंत मंत्राचमनादि' आणि स्वशाखेशीं आवरुद्ध असें अन्यशाखेंत पठित आहे तर विद्वानांहीं त्या कर्माचें अग्निहोत्रांतील आध्वर्यव हौत्रादिकर्मासारखें अवश्य अनुष्ठान करावें. ह्या श्लोकांतील शाखाशब्द सूत्रांदिकांचाहि उपलक्षक आहे. उदाहरण – आश्वलायनपरिशिष्टांत आयातु वरदा ह्या यजुःशाखीयमंत्रस्थानीं आगच्छ वरदे ह्या मंत्राची योजना केली आहे म्हणोन ह्याचेंच ग्रहण करितात. २३ मनु, कृष्णसारस्तु – ज्या देशांत काळ्या पाठीचीं हरणें स्वच्छंदानें राहतात तो देश स्नानसंध्यादिकर्मास योग्य होय. ज्यांत राहत नाहींत तो म्लेच्छदेश होय. म्लेच्छदेशांत कर्म केलें असतां देशगुणहीन होतें. २४ धर्मसूत्रांत, प्रभूतैधो – ज्या ग्रामांत उदक व दर्भसमिधादि यज्ञसामग्री बहुत आहे; आणि प्रयमण म्हणजे मूत्रपुरीषादि शौचकर्मानें स्थल स्वाधीन आहे, तेथें राहणें हें ब्राम्हणाचे धर्माचरणास हितकारक होय. ह्या सूत्रांनी ग्रामशब्द सारण्यकवसतिस्थानी रूढ आहे. २५ पराशर, स्नानं – स्नान, संध्याजप, होम (औपासनादि), देवपूजा, अतिथिसत्कार आणि वैश्वदेव हीं साहा कर्में द्विजानें नित्यशः आचरलीं पाहिजेत, जप हें संध्येंतील मुख्य कर्म असतां पुनः संध्याजप अशी जपशब्दाची आवृत्ति केल्यानें अन्यसर्वकर्मापेक्षां जप श्रेष्ठ आहे असें दर्शविलें. २६ मार्केडेयपुराणांत, शिरः – कोणतेंहि देवपित्रुद्देशानें जें संध्याब्रह्मयज्ञादिकर्म करणें तें सशिरःस्नान (डोक्यावरून स्नान) करून करावें. २७ कात्यायन, यत्र – ज्या जपहोमादिकर्माविषयीं अमुकदिशेकडे मुख करून करावें असा दिशेचा नियम सांगितला नाहीं, त्या कर्माविषयीं पूर्वा, उत्तरा आणि ऐशानी हा दिशानियम आहे; म्हणजे ह्या तीन दिशांपैकीं कोणत्याहि दिशेकडे मुख करून तें कर्म करावें. २८ यत्रोप – ज्या सूत्रादिकांत कर्म सांगितलें आहे, आणि कर्त्यानें कोणत्या अवयवांनें करावें असें सांगितलें नाहीं; तें कर्म दक्षिणावयवानें करावें. त्यांतहि दक्षिण करन कर्म करण्यास मुख्य आहे असें समजावें. २९ वराहपुराणांत,

**स्नानसंध्या**– सायंसंध्या आणि सायंहोम ह्यांवाचून स्नान, संध्या, ब्रह्मयज्ञ, सौरादिमंत्रांचा जप, होम, देवपूजा इत्यादि सर्व नित्यकर्में कांहीं एक भक्षण न करितां करावीं. ३० "मागील श्लोकांत भक्षण केल्यावाचून सर्व धर्म्यकृत्यें करावीं असें सांगितलें, आतां त्याचा कांहीं अंशीं अपवाद सांगतो." चतुर्विंशतिमतांत, इक्षूनपः– ऊस, उदक, फळें, मुळें, दूध, विडा, हीं औषधरूपानें भक्षण केलीं असतांहि स्नानदानादिक क्रिया कराव्या. शरीररक्षणार्थ औषध भक्षण केल्यानें नित्यकर्म करण्याविषयीं अनधिकारी होत नाहीं. ३१ मंडन, मुख्यकाले– जें नित्यकर्म ज्याकालीं करावयाचें तें कर्म करण्यास त्याकालीं सामर्थ्य नसेल तर मुख्यकालाच्या निकटकालीं तरी करावें. नित्यकर्माविषयीं तो गौण कालहि तत्प्रतिनिधिच होय. ३२ छंदोगपरिशिष्टांत, आसीन– ज्या कर्माविषयीं बसून करावें, उभ्यानें, अथवा ओणव्यानें करावें असा स्थितिनियम सांगितला नाहीं; तें कर्म बसूनच करावें. ३३ शाट्यायनि, **दान**– दान, आचमन, होम, भोजन, देवतार्चन, ब्रह्मयज्ञ, तर्पण, इत्यादिकर्में प्रौढपाद (पुढें सांगावयाच्या लक्षणाचा) होतांना करूं नयेत. ३४ **आसना**– जो दोनहि पावलें भूमीवर ठेवतो (उकिडवा) तो, जो गुडघ्यांवर बसतो तो, जो पोटर्‍यांवर बसतो तो, जो अनवत सक्थिकरितां म्हणजे खुडमांडी घालतो, किंवा पालथी मांडी घालतो तो, ह्यांना प्रौढपाद असें म्हणतात. असें बसून दानादि करूं नये असें पूर्वश्लोकांत सांगितलेंच आहे. ३५ छंदोगपरिशिष्टांत, **सदोप**– सर्वदा द्विजानें ब्रह्मसूत्र (जानवें) उपवीत (पुढील श्लोकांत सांगावयाच्या लक्षणाचें) असावें आणि, शिखा बांधलेली असावी. त्यांत विशेषतः विहितकर्मकालीं तर हीं दोनहि असलींच पाहिजेत, कारण, उपवीत आणि शिखाबंध असल्यावाचून जें पुण्यदायक कर्म करावें तें निरर्थक होतें. ३६ भृगु, **ब्रह्मसूत्रें**– ब्रह्मसूत्र म्हणजे जानवें, हें सव्यसे म्हणजे वामस्कंधावर असून शरीराच्या दक्षिणोर्ध्वभागास वेष्टित असलें तर त्यास यज्ञोपवीत (उपवीत सव्य) असें म्हणतात. दक्षिणस्कंधावर असून शरीराच्या वामोर्ध्वभागास वेष्टित असतां प्राचीनावीत (अपसव्य) असें म्हणतात. कंठवेष्टित अग्रभागीं माळेसारखें असल्यास निवीत असें म्हणतात. हेंच ब्रह्मसूत्र प्रायः यज्ञोपवीत असतें



Joint Project of the Rajwade Sanshodhan Mandal Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(5A)

म्हणोन ह्यास योगरूढीनें सामान्यतः यज्ञोपवीत असेंहि म्हणतात. ३७ मनु, ब्रह्मणः– वेदपठनाच्या पूर्वीं आणि वेदपठनानंतर 'ओम्' असें उच्चारण करावें. "द्रवपदार्थरीतीनें हेतु सांगतो" वेदपठनाच्या पूर्वीं (खालीं) ओंकार केला नसल्यास स्रवतें; आणि वेदपठनाच्या पश्चात् (वरतीं) ओंकार केला नसल्यास विशीर्ण होतें. जसा एकादा उदकादिद्रवपदार्थ त्यास पाहिजे तसें आस्तरणाच्छदन नसल्यानें तो गळतो किंवा सुकतो, वेदपठनजन्यफलहि तसेंच होय. ३८ आपस्तंब, तस्मा– परब्रह्मवाचक ओंकार आहे म्हणोन सर्वदा ब्राह्मणांनीं प्रणवोच्चारण करून यज्ञ, दान, तप इत्यादि शास्त्रविहित क्रियांचा आरंभ करावा. ३९ मार्कंडेय, संकल्पं– ज्या फलाच्या उद्देशानें जें स्नान, दान, व्रत इत्यादि विहित कर्म करावयाचें तें कर्म करण्यापूर्वीं त्या फलाच्या प्राप्तीकरितां, अमुकफलाकरितां अमुक कर्म करितों असा संस्कृतभाषेनें उदकपूर्वक संकल्प करावा. संकल्प केल्यावाचून पुण्यकर्मै केलीं असतां निःसारफलभूत होतात. ४० माधवकृतग्रंथांत, ईश्वरो– विहितकर्मै कर्तव्य असतां शास्त्रमर्यादेनें ज्यां व्याप्यदेशकालांची प्रवृत्ति असेल त्यांचें संकल्पसमयीं 'अमुकदेशांत अमुककालीं' असें संस्कृतभाषेनें उच्चारण करावें. देशकाल हीं ईश्वराचीं स्वरूपें होत, म्हणोन त्यांच्या चिंतनानें ईश्वराचेंच चिंतन होतें. ४१ "जसें कंद, मध इत्यादि अनुपानांनीं पारद, ताम्र इत्यादि रसायनांचे गुणदोष अधिकाधिक आणि चिरस्थायी होतात. जशी प्र, परा इत्यादि उपसर्गांनीं भ्वादिकधातूंची अर्थबोधकशक्ति विलक्षण होते. केवल अनुपानें विशेषगुणदोषाविषयीं समर्थ होत नाहींत; व केवल प्रपरादि निपात अर्थबोधकशक्तीविषयीं समर्थ होत नाहींत. तसें, ज्या पुण्यपापकर्माविषयीं ज्यांचा महिमा शास्त्रांत वर्णित आहे अशां समस्त किंवा व्यस्त देशकालांत जें पुण्यकर्म अथवा पापकर्म करावें, त्याचें फल देशकालांच्या योग्यतेप्रमाणें अधिकाधिक होतें असें सांगतो." गर्ग, तिथि– एकादशीग्रहणादिकाल, कुरुक्षेत्रगंगातीरादिदेश हे पुण्यकर्माच्या अथवा पापकर्माच्या फलाधिक्याविषयीं अंगांगीभावानें साधन होत. देशकाल हे पुण्यपापकर्मांचे अवयव असल्यानीं त्यां कर्मांवाचून पुण्यपापाविषयीं स्वतंत्रतेनें ते समर्थ होत नाहींत. ४२

Joint Project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

मनु, **कामात्मता**– ह्या जगतांत निष्कामकर्मे कोणींच करीत नाहीं; कारण वेदांचें अध्ययन आणि यज्ञादि
५ वैदिकधर्मसंबंधहि काम्य म्हणजे इच्छाविषयच आहे, परंतु स्वर्गादिफलांच्या अभिलाषानें अनुष्ठित केले-
लीं काम्य कर्मे कर्मानुरूप स्वर्गादिकांच्या उपभोगानंतर जन्मादिदुःखास निमित्त होतात; म्हणोन तीं प्रशस्त
नव्हेत. स्वर्गादिफलांच्या अभिलाषावाचून केलेलीं नित्यनैमित्तिक कर्मे आत्मज्ञानद्वारा मोक्षाविषयीं समर्थ
होतात; म्हणोन तींच प्रशस्त होत. ४३ ब्रह्मपुराणांत, **ब्रह्मण्याधाय**– निःसंग म्हणजे कोणत्याहि कर्मांत अ-
न्यकर्मांचा अभिनिवेश न करितां धनपुत्रादिइच्छारहित केवलब्रह्मार्पणबुद्धीनें प्रसन्नांतःकरणेंकरून
विहितकर्मे करणारा ब्रह्मपदास प्राप्त होतो. ४४ याज्ञवल्क्य, **आर्षं**– कर्मामध्यें ज्या मंत्राचा उच्चारण प्रसं-
ग असेल त्याच्या पूर्वी त्या मंत्राचे ऋषि, देवता, छंद आणि कोणत्या कर्माकडे त्याचा उपयोग करावयाचा, ह्यां-
चें द्विजांनीं अर्थज्ञानपूर्वक उच्चारण करावें; त्यांत ब्राह्मणानें अवश्य केलेंच पाहिजे. ४५ शौनक, **यस्य**–
ज्यास प्रथमतः ज्या मंत्राचा उपदेश झाला आहे तो त्या मंत्राचा ऋषि; ज्या मंत्रांत ज्या देवतेचें स्तवन आ-
हे त्या मंत्राची ती देवता; आणि गायत्र्यादिच्छंदांचा जो अक्षर नियम आहे त्यांपैकीं ज्या छंदाच्या नियमा-
प्रमाणें ज्या मंत्राचा अक्षरनियम आहे त्या मंत्राचा तो छंद होय. ह्याचें प्रयोजन पूर्वश्लोकांत सांगितलें
आहे. ४६ "कर्मामध्यें मंत्रादिपठनप्रसंगीं पठन करणारानें पाठाविषयीं कोणत्यां गुणांचा अवश्य स्वीकार
केला पाहिजे हें सांगतो." पाणिनिशिक्षेंत, **माधुर्य**– ज्या वर्णोच्चारणसमकालीं कर्णेंद्रियास सुख होतें
त्या वर्णगुणास माधुर्य (मधुरगुण) असें म्हणतात. हा एकगुण, एकमात्रादिकाल, व्यंजनादिसंधि, यम,
ताल्वादिस्थानें इत्यादिकांच्या तारतम्यानें अक्षराचें जें उच्चारण व्हावयाचें तें होणें; आणि परस्पर अक्ष-
रांमध्यें जो व्यवस्थित कालनियम असावयाचा तो असणें; ह्या गुणास अक्षरव्यक्ति असें म्हणतात. हा
दुसरा गुण, संधि, उदात्तानुदात्त इत्यादिकांच्या विभागनियमा प्रमाणें, अत्यंतसन्निकर्षरूपसंहितेच्या विक- ५
ल्पविषयस्थलीं, ऱ्हस्वदीर्घादिकांचा न्यूनाधिकभाव न होतां युक्तीनें उच्चारणाचा विराम करणें; ह्या गुणास

Joint project of the Rajawade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(6A)

पदच्छेद असें म्हणतात- हा तिसरा गुण, ऱ्हस्वदीर्घप्लुतनिष्ठउदात्तादिकांचा ताल्वादिउर्ध्वाधरभागांनीं भेद दर्शविणें; ह्या गुणास सुस्वर असें म्हणतात- हा चवथा गुण, भयशोकप्रमादोन्मादादिकेंकरून कंपादि विकार न होतां उच्चारण करणें; ह्या गुणास धैर्य असें म्हणतात- हा पांचवा गुण आणि ज्या त्रुट्यादिनियमितकालास अवलंबून मंत्रादिकांचा आरंभ केला असेल, त्याच नियमानें समाप्ति करणें; ह्या गुणास लयसमर्थ (लयासहित, साम्यसमर्थ) असें म्हणतात- हा साहावा गुण, हे सहा गुण म्हणणाराच्या अंगीं असावेत- ४७ "संध्यादिनित्यकर्माविषयीं प्रतिपदादिनिमित्तक अध्ययनाचा निषेध नाहीं असें सांगतो" मनु, **वेदोपकरणे**– नित्यकर्मांतील मंत्रांच्या पठनाविषयीं अनध्यायकालनिमित्तक प्रतिबंध नाहीं- उदाहण;- उपाकर्म, ब्रह्मयज्ञ, होम, ह्यांतील मंत्रांचा पाठ यथोक्तनियमाप्रमाणें करावा. ४८ "विश्वामित्रपराशरादिऋषींनीं आणि ब्रह्मदेवप्रभृति देवानीं जसें लोहपिष्टभक्षणादिनिग्रहपूर्वकतपश्चर्येनें सुकृत संपादन केलें, अथवा जशी अयाज्ययाजनादिदुष्कर्मांकडे प्रवृत्ति केली; तसें करण्यास अल्पशक्ति मनुष्य योग्य नाहीं- कारण, त्यांस पूर्वार्जितमहापुण्यसंपत्तीनें दुष्कर्मजन्यप्रत्यवायापासून निवृत्त होण्याची अथवा महापुण्यौघसंपादनाकरितां अत्युत्कट तपश्चर्या करण्याची शक्ति होती- अल्पशक्ति मनुष्य जरीं सुकृताच्या संचयार्थ लोहपिष्टभक्षणासारखें घोर कर्म करील तरीं तें संकल्पितकर्म सिद्धीस न जातां आत्महननादिकांच्या पापास मात्र पात्र होईल- यथार्थ वेदतत्त्वज्ञातृत्व, शक्ताशक्ततारतम्यविचार आणि सत्यवक्तृत्व हे गुण देवादिकांच्या अंगीं असल्यानें त्यांहीं उपकार बुद्धीनें सांगितलेलें वचनच प्रमाण मानावें हें युक्त आहे, ह्याविषयीं सांगतो." हारीत, **अनुष्ठितं**- देवांहीं किंवा ऋषीहीं जें कर्म आचरिलें तें न आचरितां त्यांहीं सांगितलेलें मात्र कर्म आचरावें- ४९ ह्या प्रमाणें उपोद्घातप्रकरण समाप्त झालें. ॥ १ ॥ ॥ आतां प्रबोध ह्मणजे जागृत होणें, आणि तत्समकालीं आचरावयाचें ईश्वरचिंतनादि हें प्रकरण सांगतो. ॥ आश्वलायन, **अथोच्यते**– गृहस्थानें जें कर्म केलें असतां देव, पितर आणि मनुष्य ह्यांच्या ऋणापासून तो मुक्त होतो, तें वेदवाक्यानुसारि नित्यकर्म सांगतो.

Joint Project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai.

(७)



जसा पुत्र जन्मतःच पित्याच्या रिक्थऋणांचा अधिकारी होतो; तसा गृहस्थ विवाहसमकालीं देवादिऋणांचा

श्रीगणेशायनः प्रातःकालीं स्मरणकरावयाचें तें सांगतों. (हें सर्व प्रातःस्मरण व्यासानें केलेलें आहे.) **महर्षि**—पूर्वी महाऋषिभगवान् धर्मस्वरूपीव्यासांनीं ही (पुढें सांगावयाची) चतुःश्लोकी वाक्यरचना करून तिचें चिंतन शुकनामकपुत्राकडून करविलें. १ **माता**—संसारांमध्यें जीवमात्र, सहस्रशःमातापितरांचा आणि शतशः स्त्रीपुत्रादिकांचा अनुभव घेते झाले; घेतात; आणि घेतील. २ **हर्ष**—प्रत्यहीं सहस्रशः हर्षाचीं (ऐहिकसुखाचीं) निमित्तें आणि शतशः भयाचीं निमित्तें मूढास म्हणजे मायावृत होऊन स्त्रीपुत्रादिक्षणिकसुखाविषयीं आसक्त झालेल्यास प्राप्त होतात; परंतु पंडितास म्हणजे ब्रह्मज्ञानानें संसाराविषयीं मिथ्यात्व कल्पकास प्राप्त होत नाहींत. ३ **ऊर्ध्वबाहु**—सर्वांस समजण्याकरितां हस्त उंच करून हा मी ओरडून सांगतों; कीं धर्मापासून अर्थ, काम आणि मोक्ष हे प्राप्त होतात; तस्मात् धर्मसंपादन कॉ करीत नाहींत? हें माझें वचन कोणीहि ऐकणार नाहीं काय!!! ४ **नजातु**—कधींहि, कामाच्या स्वाधीन होऊन धर्माचा म्हणजे पुण्याचा अथवा पुण्यसाधनीभूतविहितकर्माचा त्याग करूं नये. कारण, धर्मापासून संसारामध्यें पुनः परावर्तन होत नाहीं असा सच्चिदानंदस्वरूपीं लीनतारूप मोक्ष प्राप्त होतो, म्हणोन धर्म हाच शाश्वत आहे; आणि कामिकप्रवृत्तीनें सुख प्राप्त होतें न होतें हा संशय! कदाचित् प्राप्त झालें तरी तें क्षणिक होय. एतदर्थ सांशयिकअल्पसुखाकरितां निश्चितमहासुखाचा त्याग करणें हें अयोग्य आहे. कधींहि, धननाशादिदुःखभयानें धर्म न सोडावा. धर्मसंरक्षणापासून पुनः धनादिकांची प्राप्ति झाली असतां तें दुःख निवृत्त होतें. ह्यास्तव दुःखहि अनित्य होय. कधींहि, धनपुत्रादिसृष्टपदार्थ अचिरस्थायी असल्यानें तज्जन्य सुखहि अचिरस्थायी ६

अधिकारी होतो. एतदर्थ त्यानें ब्रह्मयज्ञादिनित्यकर्मानें त्या ऋणापासून मुक्त झालें पाहिजे. १

(7A)

व पुत्रादिकांविषयीं स्वतंत्रास्वतंत्रेचा संदेह म्हणोन त्यांच्या लोभानेंहि धर्म टाकूं नये. जीव म्हणजे आत्मा उत्पत्तिविनाशशून्य आहे; आणि ह्याचा जीवव्यवहार (जन्मी व्यवहार) प्राप्त होण्याचा हेतु म्हणजे अज्ञाननिमित्तपंचभूतात्मकदेहोपाधि हा अनित्य (नाशवंत) आहे. देहोपाधिविशिष्टजीवाच्या रक्षणार्थ धर्माची हानि केली तरी देहाचा नाश व्हावयाचाच व आत्म्याच्या रक्षणास्तव धर्माची हानि न केली तरी तो अविनाशीच आहे. ह्याकरितां जीवितस्थितीच्या निमित्तानेंहि धर्माचा अनादर करूं नये. ५ **इमां**— अरुणोदयकालीं जागृत होऊन ह्या (पूर्वचतुःश्लोकीरूप) भारतसावित्रीनें म्हणजे भारतांतीलसवितृब्रह्मद्योतकवाणीनें जो चिंतन करील तो भारतज्ञानाचें जें धर्माधर्माविषयीं आदरानादरात्मक फल त्या फलास प्राप्त होत्साता मुक्त होईल. ६ **प्रातः**— प्रातःकालीं मी, पुनर्जन्माची भीति आणि प्राप्तजन्माची महापीडा ह्यांच्या शमनार्थ गरुडवाहनाचा, श्यामवर्ण, नक्रानें पराभव केलेल्यागजेंद्राच्या मुक्तिविषयीं कारणभूत, चक्र आहे आयुध ज्याचें, आणि प्रफुल्लितकमलपत्रासारखें आहे नेत्र ज्याचें अशा नारायणाचें चिंतन करितों. ७ **प्रातर्नमामि**— प्रातःकालीं मी मनानें, वाणीनें, आणि मस्तकानें परमपुरुष, नरकार्णवापासून तारणारा, वेदादिपारायणाविषयीं जे आसक्त विप्र हेंच आहे श्रेष्ठ वसतिस्थान ज्याचें अशा नारायणाचें चरणकमलयुगल वंदितों. ८ **प्रातर्भजामि**— प्रातःकालीं मी पूर्वी सर्वजन्मांत केलेल्यां पापांचा परिणाम दुःखरूपी होईल, ह्या भयाच्या दूरीकरणार्थ भक्तांस अभय करणारा, जो शंखचक्रधारण करीत होत्साता नक्रमुखांत सांपडला आहे चरण ज्याचा अशा गजेंद्राच्या घोर शोकाचा नाश करिता झाला त्या नारायणाचें भजन करितों. ९ **श्लोकत्रय**— प्रत्यहीं प्रातः हे तीन श्लोक श्रद्धाभक्तींनीं जो मनुष्य पठन करील त्यास त्रैलोक्यश्रेष्ठ हरि आपलें पद देईल. १० **प्रातःस्मरामि**— प्रातःकालीं, प्राप्तहोणाऱ्या संसार भयाचा हरण कर्ता, देवश्रेष्ठ, गंगेचा धारणकर्ता, नंदी आहे

वाहन ज्याचें, पार्वतीपति, खट्वांग, त्रिशूल, वरदमुद्रा आणि अभयमुद्रा एतद्युक्त आहेत कर ज्याचे, प्राप्त झालेल्या संसाररूपी रोगाचा औषधस्थानापन्न नाशकर्ता आणि अनुपम अशा ईशाचें स्मरण करितों. ११ प्रातर्नमामि – कैलासनाथ, अर्धांगी आहे पार्वती ज्याच्या, उत्पत्तिस्थितिसंहारांचा कारणभूत, स्वयंभू, कामजेता अशा विश्वेश्वरास नमस्कार करितों. १२ प्रातर्भजामि – सत्य, व्यापक, अनादि, उपनिषदादि वेदांताभ्यासानें जाणण्यास योग्य, निष्कलंक, महापुरुष, वस्तुतः नामरूपादि विकारशून्य ब्रह्मस्वरूपी, प्रागभावादि साहा अभावें करून रहित अशा शिवाचें भजन करितों. १३ प्रातः समुत्थाय – नित्यशः प्रातःकालीं उठून ह्या तीन श्लोकांचें (ह्यांत वर्णिलेलें) शिवध्यानचिंतनपूर्वक जे पठन करितील, ते बहुतजन्मांत पापरूपानें संचित केलेल्या होणाऱ्या दुःखमात्राचा त्याग करून शंभुपदास प्राप्त होतील. १४ प्रातः स्मरामि – अनाथांचा नाथ, सिंदूरपूरितशोभायमान आहे गंडस्थलयुगुल ज्याचें, प्रचंडविघ्नाच्या खंडनाविषयीं भयंकर आहे दंड ज्याचा, इंद्रादि देवनायकांचा समुदाय ज्याचें वंदन करितो अशा गणपतीचें प्रातःकालीं स्मरण करितों. १५ प्रातर्नमामि – ब्रह्मदेव ज्याची स्तुति करितो, सर्वांस अभिलषित वर देणारा, लंबोदर, नागयज्ञोपवीती, भवानीशंकरांचा बाललीलेविषयीं चतुर पुत्र ह्यास कल्याणाकरितां नमितों. १६ प्रातर्भजा – अभय देणारा, भक्तांच्या शोकाचा नाश करण्याविषयीं दावाग्नि, गणपति, गजानन, अज्ञानारण्याचा नाश करण्याविषयीं अग्नि, उत्साहाची वृद्धि करणारा अशा शिवपुत्रास मी भजतों. १७ श्लोकत्रय – नित्यशः जो प्रातःकालीं उठून भक्तिभूत होत्साता ह्यां पुण्यरूप तीन श्लोकांचें पठन करील त्यास सर्वदा सार्वभौमपदवी प्राप्त होईल. १८ प्रातः स्मरामि – ऋग्वेद हेंच ज्याचें मंडल, यजुर्वेद हाच ज्याचा देह, सामवेद हाच ज्याचें किरण, जें प्रभवादिकालनियमाचें कारण, जें ब्रह्मविष्णुमहेश्वरात्मक, जें चर्मचक्षूनें ज्ञात होण्यास अशक्य आणि

(8A)

अंतःकरणानेंहि चिंतन करण्यास अशक्य, सवित्याच्या त्या श्रेष्ठरूपाचें स्मरण करितों. १९ प्रातर्नमामि— ब्रह्मदेवप्रभृतिसुरांनीं स्तुत आणि पूजित, दृष्टीच्या मोक्षबंधनांचा हेतुभूत, त्रैलोक्यपालनकर्ता, परब्रह्मस्वरूप असून रजस्तमःसत्वगुणांचा आश्रय अशा सूर्यास कायावाचामनेंकरून नमस्कार करितों. २० प्रातर्भजामि— जो अनंतशक्तिमान्, पापसमुदाय, शत्रु व रोग ह्यांचा नाशकर्ता, श्रेष्ठ, सर्वलोकांच्या आकलनाविषयीं कालरूपी आहे मूर्ति ज्याची, ज्याच्या योगानें गायींच्या कंठांचें बंधन व विमोचन होतें, जो अनादि त्या सवित्याचें प्रातःकालीं भजन करितों. २१ श्लोकत्रय— जो निरंतर प्रातःकालीं भानूचे हे तीन श्लोक पठन करील त्यास सर्वरोग दूर होऊन परम सुख प्राप्त होईल. २२ प्रातःस्मरामि— हे देवि, शरच्चंद्रासारखी आहे कांति जीची, उत्तमरत्नखचित आहेत कुंडलहारादि सर्व अलंकार जीचे, दिव्यायुधांच्या धारणानें शक्तिमान व नीलवर्ण आहेत सहस्त्र हस्त जीचे, रक्तकमलाच्या कांतीसारखी आहे चरणकांति जीची अशी तूं आहेस, तुझें चिंतन करितों. २३ प्रातर्नमामि— महिषासुर, चंड, मुंड, शुंभासुर हे मुख्य आहेत ज्यांमध्यें अशा दैत्यांचा नाश करण्याविषयीं दक्ष, ब्रह्मदेव, इंद्र, रुद्र, मुनि, ह्यांचें मोहन करणारा चंचल आहे स्वभाव जीचा, संपूर्णदेवांच्या अंशांनीं जीची मूर्ति झालेली, अनेकरूपें धारण करणारी, अशा चंडीला नमस्कार करितों. २४ प्रातर्भजामि— भक्तांना इच्छित देणारी, सर्वजगतांची उत्पादनकर्त्री, पापाचा नाश करणारी, संसारसंबंधी प्रवृत्तिनिवृत्तीविषयीं कारणभूत, अशा परमात्म्याविष्णूच्या महामायेला शरणागत होऊन भजतों. २५ श्लोक— जो मनुष्य चंडिकादेवीचे हे तीन श्लोक पठन करील तो इच्छितपदार्थांसि प्राप्त होत्साता वैकुंठीं पूज्य होईल. २६ प्रातःस्मरामि— मंदहास्ययुक्त, मधुर भाषण करणारें, विस्तीर्ण आहे भालप्रदेश ज्याचा, कर्णसंबंधीचंचल कुंडलांनीं सुशोभित आहेत गाल ज्याचे, कर्णाच्या प्रांतभागपर्यंत दीर्घ आहेत नयनें ज्याचीं, अवलोकनास

सुंदर, रामचंद्राच्या अशा मुखकमलाचें प्रातःकालीं स्मरण करितों. २७ प्रातर्भजामि – जें राक्षससमुदायास भय देणारें, भक्तांना वर देणारें; जनकराजाच्या सभेमध्यें महेश्वराच्या धनुष्याचा भंग करून तत्कालींच सीतेच्या पाणिग्रहणरूपमंगलास प्राप्त झालें, रघुनाथाच्या अशा करकमलाचें भजन करितों. २८ प्रातर्नमामि – वज्र, अंकुश इत्यादिकांच्या शुभरेखांनी युक्त, मला सुख देणारें, योगिश्रेष्ठांच्या अंतःकरणभ्रमरानें सेवित, अहल्येच्या शापाचें त्वरित नाशन करणारें, असें रघुनाथाचें पदकमल वंदितों. २९ प्रातर्वदामि – पार्वतीनें स्वपतिशंकरासह उपभोग व्हावा, ह्या मनोरथानें प्रीतीकरून ज्या सर्वविष्णुसहस्रनामांचा जप केला, 'शिवानें कामाचें दहन केलें तो रत होणार नाहीं; हें जप करण्याचें कारण होय.' जें वाचेच्या दोषाचें हरण करणारें, सर्वदुर्गंधाचा नाश करणारें त्या रामनामाचें वैखरीवाणीनें उच्चारण करितों. ३० प्रातःश्रये – वेदांनीं स्तविलेली, नील मेघ, नील कमल आणि इंद्रनीलमणि ह्यांसारखी नीलवर्ण, आमुक्त म्हणजे जडित आहेत उत्तम मौक्तिकें ज्यांस अशा अलंकारांनीं युक्त, समस्त मुनि जिचें ध्यान करितात, लोकांच्या मुक्तीस कारणभूत अशा रघुनाथमूर्तीची सेवा करावी. ३१ यः श्लोक – जो पुरुष नित्य प्रभातसमयीं जागृत होऊन शुचिर्भूततेनें ह्यां पांच श्लोकांचा पाठ करील तो श्रीरामसेवकजनांमध्यें मुख्य होऊन भक्तांवाचून अन्यांही प्राप्त व्हावयाचा नाहीं अशा वैकुंठास प्राप्त होईल. ३२ ब्रह्मा – ब्रह्मदेव, विष्णु, शंकर, रवि, चंद्र, मंगळ, बुध, गुरु, शुक्र, शनि, राहु आणि केतु हे सर्व माझें सुप्रभात म्हणजे शुभसूचक प्रातःकाल करोत, प्रभात हें अहोरात्रीचें उपलक्षण आहे. परमात्मचिंतनेंकरून रात्रिगतदुष्टस्वप्नाद्यनुमितअरिष्टाचा नाश होऊन कल्याणाची प्राप्ति व्हावी; हा इच्छेचा विषय होय. ३३ भृगु – भृगु, वसिष्ठ इत्यादि धर्मादिनीतिप्रवर्तक द्वादश ऋषि माझें सुप्रभात करोत. ३४ सनत्कुमारः – सनत्कुमारादि साहा ब्रह्मवेत्ते ऋषि, सामादिगायनांत असणारे षड्जादि सात स्वर आणि पृथ्वींतील रजतादि धातूचीं सात तलें



"Joint project of the Rajwade Sanshodhan Mandal, Dhule and the Yashwantrao Chavan Pratishthan, Mumbai."

(9A)

मन्तु, **ब्राह्मे**— पुढील श्लोकांत सांगावयाच्या ब्राह्ममुहूर्तकालीं जागृत होऊन कोणत्या मार्गानें धर्म व अर्थ संपादित होतील; धर्मार्थ संपादित करण्यास शरीराला क्लेश कितीं आहेत, कारण जेंकडून अल्पायासानें अनिंदित महाधर्मार्थ साधित होतील ती सरणि स्वीकारावी हा न्याय आहे; आणि विशेषेंकरून वेद तत्वार्थ

माझें सुप्रभात करोत. ३५ **सप्तार्णवाः**— नवनीतादि सप्तसमुद्र, महेंद्रादि सप्तकुलपर्वत, कश्यपादि सप्तऋषि, जंबुद्वीपादि सात द्वीपें, भूरादि सप्तभुवनें, हीं माझें सुप्रभात करोत. ३६ **पृथ्वी**— गंधगुणवती पृथिवी, रसनेंद्रियग्राह्य रसगुणवान उदक, स्पर्शगुणवान वायु, उष्णस्पर्शवान तेज, शब्दगुणवान आकाश आणि महत्तत्त्व हीं माझें सुप्रभात करोत. ३७ **इत्थं**— ह्या प्रकारच्या परमात्मगुणांचें जो पठन करील, स्मरण करील अथवा श्रवण करील, त्याचें भगवंताच्या प्रसादानें सुप्रभात होईल. येथें दुःस्वप्नसूचित अरिष्टाचा नाश होणें हाच सुप्रभातशब्दाचा अर्थ होय. ३८ **पुण्यश्लोको**— पुण्यरूप आहे यश ज्यांचें अशा नलराजादिकांचें स्मरण करावें ह्यांच्या स्मरणानें ह्यांच्या सदाचरणाचें स्मरण होऊन तदनुरूपवर्तनानें स्मरणकर्ता पुण्यवान होईल. ३९ **अश्वत्थामा; सप्तैतान्**— अश्वत्थामादि सात चिरंजीव आणि मार्कंडेय ह्यांचें जो स्मरण करील तो सर्वव्याधिमुक्त होत्साता शंभर वर्षे वांचेल. ४०. ४१ **अहल्या**— अहल्यादि पांच पतिव्रतांचें स्मरण केलें असतां महापापांचा नाश होईल. ४२ "पृथ्वी ही विष्णूची वशवर्तिनी आहे म्हणोन स्त्रीरूपानें तिचें वर्णन करितो." **समुद्र**— समुद्र हेच आहेत वस्त्रें जीचीं, पर्वत आहेत स्तन जीचे अशाप्रकारांची हे देवि (गतिमती) हे विष्णुपत्नि तुला नमस्कार असो. माझ्या चरणांचा स्पर्श तुला

म्हणजे परमात्मा ह्यांचें चिंतन करावें. ब्राह्ममुहूर्तांत जागृतिसमकालीं बुद्धीचें स्वास्थ्य असतें म्हणोन चिंतनाविषयीं हाच मुख्य काल होय. धर्मसंपादनपूर्वक अर्थसंपादन म्हटलें म्हणजे न्यायानेंच अर्थसाधन होईल ह्याविषयीं पृथक् सांगणें नको. धर्मार्थमूलक कामप्राप्ति आणि परमात्मज्ञानानें कैवल्यप्राप्ति होईल. म्हणोन

चतुर्विधपुरुषार्थसाधनविधिबोधक ही स्मृति आहे. २ विष्णुपुराणांत, **रात्रेः** — रात्रीच्या चवथ्या प्रहराच्या ति-
सऱ्या मुहूर्तास (प्रहराचे मुहूर्त च्यार असतात.) ब्राह्ममुहूर्त असें म्हणतात. ह्या मुहूर्तांत जागृत व्हावें. ३ अंगिराः,
**उत्थाय** — रात्रीच्या शेवटच्या प्रहरांत उठून रात्रींत नेसलेलें वस्त्र सोडून दुसरें नेसावें, आणखी हस्तपाद व मु-
ख ह्यांचें साधारणतः प्रक्षालन करून, नेत्र, नासिका आणि कर्ण ह्यांस उदक लावून हरिस्मरण करावें. ४ आग-
मांत, **ब्राह्मे** — ह्यात्यानें ब्राह्ममुहूर्तीं उठून रामाचें स्मरण करावें तें असें;— श्रीशब्द आहे पूर्वी ज्याच्या व जयशब्द
आहे मध्यें ज्याच्या आणि पुनः द्विवार जयशब्दाच्या शेवटीं. असा त्रयोदशाक्षररचनात्मक मंत्र होय. हा मंत्र

होतो; ह्याची तूं क्षमा कर. ४३ **श्रीराम** — देवतावाचक शब्दाचें श्रीशब्दपूर्वक उच्चारण करावें असा स्मृ-
तिनियम आहे. अथवा श्री म्हणजे लक्ष्मी. ज्याविषयीं योगी परम सुखाकरितां रममाण होतात
त्यास राम असें म्हणतात. लक्ष्मीचा सीतारूपानें आणि विष्णूचा रामरूपानें भूतलीं आविर्भाव झाला
हें प्रसिद्ध आहे. अतएव हे श्रीराम म्हणजे हे सीतासहितरामा, जय म्हणजे सर्वोत्कर्षेंकरून राहा.
हे राम, जय जय म्हणजे माझ्या मायाजालाचा नाश कर. लक्ष्मीवाचक श्रीशब्द हें गौणविशेषण दे-
ण्याचें कारण, माया हें लक्ष्मीचें स्वरूप आहे; आणि लक्ष्मी तुझी स्वाधीन पत्नी आहे. ह्यास्तव मायेपासून
माझी मुक्तता करण्यास तूं असमर्थ नाहींस. एकवार जयशब्दानें सर्वोत्कर्षेंकरून राहा ही स्तु-
ति आणि पुनः द्विवार जयशब्दानें मायेपासून मुक्त कर, ही प्रार्थना आहे. जिधातु उत्कर्षार्थी अ-
कर्मक व पराभवार्थी सकर्मक आहे. सकर्मकाच्या योगानें माया हें अध्याहृत कर्म आहे. कोणताहि
पदार्थ लब्ध करून घेणें आहे तर ज्यापासून घ्यावयाचा त्याची वारंवार संबोधनपूर्वक स्तुति क-
रून याचनीय पदार्थाची मुद्रादिकें करून किंवा वाणीनें पुनःपुनः याचना करावी, हा लोकसिद्ध न्याय
आहे. ४४ **प्रातरग्निमिति** — प्रातरग्नि ह्या सप्तऋचात्मक सूक्ताचा मित्रावरुणाचा पुत्र वसिष्ठ-
नामक ऋषि, भगनामकदेवता, प्रथमऋचेची भगदेवता असून आणखी अग्नि इंद्र इत्यादि दश देवता,

(10A)

प्रयोगांत स्पष्ट लिहिला आहे. ५ ऋग्विधानांत, **प्रातरग्निं**— प्रातरग्निं अशी आहे प्राथमिक आनुपूर्वी ज्यास अशा सप्तऋचात्मकसूक्ताचा प्रातःकालीं जप करावा. ६ कात्यायन, **श्रोत्रियं**— जो प्रातःकालीं उठून वेदाध्ययनकर्ता, ज्याचें महात्म्य लोकांत प्रसिद्ध आहे असा, अग्नि, आणि अग्निहोत्री ह्यांस अवलोकन करील तो आप-

प्रथमऋचेचा जगतीछंद व बाकीच्या साहा ऋचांचा त्रिष्टुप्छंद आणि प्रातःस्मरणाकडे उपयोग म॰ सांप्रत ह्यासूक्तानें भगादिदेवतेंचें स्तुतिपूर्वकचिंतन करावयाचें. ४५ **ओंप्रातरग्निं**— ओं म्हणजे ब्रह्म, प्रणवपूर्वक विहितक्रिया करावी असा उपोद्घातांत नियम लिहिला आहे. ह्याची विशेषव्याख्या प्राणायाममंत्रांत लिहावयाची आहे. उषःकालीं स्तवन कर्ते आम्हीं अग्निदेवास निमंत्रितों; आणखी मित्र, वरुण, देवांचे वैद्य अश्विनीकुमार, भग, पूषा, ब्रह्मणस्पति, सोम, रुद्र ह्यांदेवांचें आव्हान करितों. ह्या मंत्रांत पृथक्पृथक्स्तुतिज्ञापनार्थ पुनः पुनः प्रातःशब्दाचा आणि द्विवार क्रियापदाचा प्रयोग केला आहे. ४६ **प्रातर्जितं**— जो जगताचा धारक, ज्यास इंद्रहि ज्यास धनवान्हि व राजाहि स्तवन करीत होत्साता धन मलादे असें बोलतो, त्या सर्वोत्कर्षेंकरून राहणाऱ्या, उग्रत, अदितीच्या भगनामकपुत्रास प्रातःकालीं आम्हीं निमंत्रितों. ४७ **भग**— हे भगदेव, तूं महानायक आहेस. हे भग, तूं सत्यधन आहेस. हे भग, आमचे मनोरथ पूर्ण करीत होत्साता ही आमची स्तुति सफल कर. हे भग, आम्हांला गाची आणि अश्व इहींकरून युक्त कर. हे भग, तुझ्या प्रसादानें आम्ही उत्तमपुत्रादिमनुष्यसंपत्तिमंत होऊं. ४८ आणखी आतां (उषःकाळीं) आणखी पूर्वाह्णकालीं आणखी मध्याह्नकालीं आम्हीं धनवंत होऊं. हे मघवन् (पूज्यभग), सूर्याचा (तुझा) उदय झाला

तींपासून मुक्त होईल. ७ **रोचनां**— गोरोचन, चंदन, सुगंधपदार्थ, मृदंग, आरसा, हीरकादि मणि, गुरु, अग्नि आणि सूर्य ह्यांस प्रातःकालीं अवश्य अवलोकन करून नमस्कार करावा. ८ **पापिष्ठं**— जो प्रातःकाली उठून पापी, दुर्भाग्य, अंध, नग्न, ज्याचें नाक कापलेलें आहे असा ह्यांस पाहील, तें त्यास कलहाचें मूल होय. ९

# मूळ प्रत पाहण्यासाठी संपर्क

---

**इतिहासाचार्य वि.का. राजवाडे संशोधन मंडळ, धुळे**
राजवाडे पथ, गल्ली नं. १, धुळे-४२४००१ (महाराष्ट्र)
**दूरध्वनी क्रमांक** (०२५६२) २३३८४८
**Email ID** : rajwademandaldhule@gmail.com